राम जी की निकली सवारी, राम जी की लीला है न्यारी

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७८ वा ▶ सोमवार दि.२२ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

दादागिरीची भाषा करू नका, २६ जानेवारीच्या आधी तोडगा काढा

जरांगेंचा सरकारला इशारा

जालना । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे शनिवारी मुंबईच्या दिशेने निघाले असून, त्यांच्या पायी दिंडीचा आजचा दुसरा दिवस आहे. दरम्यान, आज निघणाऱ्या पायी दिंडीपूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. २६ जानेवारीच्या आधी तोडगा काढा, मुंबईत येऊ नका असे म्हणत दादागिरीची भाषा करू नयेत. त्यांना मराठ्यांची ताकद पहायची असेल, असे म्हणत जरांगे यांनी आज पुन्हा सरकारवर हल्लाबोल केला आहे.

यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की,संविधान हातात घेऊ नयेत, यावर तोडगा कसा काढता येईल, सत्ता येत असते जात असते. मराठा समाज मोठ्या संख्येने मुंबईत दाखल होणार आहे. आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहे. आमच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यांना मराठ्यांची ताकद पहायची असेल. मराठा समाजाचा हा शेवटचा लढा आहेत. दोन दिवस वाट पाहणार अन्यथा त्यांनी आमच्या गावात येऊ नयेत. मुंबईला येऊ नका असे कसे म्हणतात, दादागिरीची भाषा करू नयेत. २६ जानेवारीच्या आधी तोडगा काढा, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

निघणाऱ्या पायी दिंडीपूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. २६ जानेवारीच्या आधी तोडगा काढा, मुंबईत येऊ नका असे म्हणत दादागिरीची भाषा करू नयेत. त्यांना मराठ्यांची ताकद पहायची असेल, असे म्हणत जरांगे यांनी आज पुन्हा सरकारवर हल्लाबोल केला आहे. संविधान हातात घेऊ नयेत, यावर तोडगा कसा काढता येईल पहावे, सत्ता येत असते जात असते. मराठा समाज मोठ्या संख्येने मुंबईत दाखल होणार आहे. मुंबईला येऊ नका असे कसे म्हणतात, दादागिरीची भाषा करू नयेत. २६ जानेवारीच्या आधी तोडगा काढा. असे देखील त्यांनी सांगितले.

बाप-लेकाची भेट...

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात आमरण उपोषण करण्याची घोषणा मनोज जरांगे यांच्याकडून करण्यात आली होती. त्यानुसार जरांगे हे कालपासून पायी दिंडी घेऊन मुंबईकडे निघाले आहे. यावेळी काल रस्त्यात त्यांचे मुलं आणि पत्नी देखील दिंडीत सहभागी झाले होते. मुलांची भेट घेतल्यावर जरांगे भावूक झाले होते.

गोळ्या घातल्या तरीही एक इंच सुद्धा मागे हटणार नाही

आम्हाला धमक्या द्यायच्या नाहीत. आम्ही मराठा समाजाचा संघर्ष उभा केलाय, तुमच्यात एकमत आहे का नाही हे माहिती नाही. आता मराठे एक तासही तुम्हाला वेळ देणार नाहीत. आता ते डाव टाकतील, त्यात त्यांना यश येऊ द्यायचं नाही. मी पुन्हा येईल का नाही माहिती नाही. पण आपल्या मुलाला नाही तर कोणालाच नाही. मला गोळ्या घातल्या तरीही एक इंच सुद्धा मागे हटणार नाही. पहिल्या दिवशी जी ताकद होती आपल्याला कायम ठेवावी लागेल, असे जरांगे म्हणाले.

पांझरा नदीपात्रात ६० फूट उंचीच्या श्रीराममंदीराची प्रतिकृती उभारली

अनुप अग्रवालांतर्फे १० दिवस विविध कार्यक्रमांचं आयोजन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

अयोध्येत उभारल्या गेलेल्या प्रभु श्रीरामांच्या मंदीराची प्रतिकृती धुळे शहरातील पांझरा नदीपात्रात कालिकादेवी मंदीराजवळ श्रीरामभक्त अनुप अग्रवाल यांच्या वतीने उभारण्यात आली आहे. भाजपा धुळे शहर विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल यांनी आपल्या पक्षाचे नाव व पद न लावता केवळ एक हिंदु श्रीरामभक्त म्हणून या मंदीराची उभारणी केली आहे. यासाठी कुणाकडूनही एक पैसा न घेता सर्व खर्च अग्रवाल हे स्वत: करीत आहेत. थर्माकोलच्या साहाय्याने उभारले जात असलेले हे मंदीर ६० फूट उंच आहे. मंदीर निर्मिती साकारलेले सर्व कारागीर हे धुळ्यातील स्थानिक रहिवाशी आहेत. यासाठी रात्रंदिवस वेगात काम करण्यात आलं आहे. या स्थळाला तात्पुरते अयोध्याधाम असे नाव देण्यात आले आहे. अयोध्येत स्थापित केली जाणारी श्रीरामांची मुर्तीची प्रतिकृती या अयोध्याधाममध्येही स्थापित केली जाणार आहे. तत्पूर्वी २१ जानेवारीला या मुर्तीची आग्रा रोडवरील छत्रपती शिवरायांच्या मंदीरापासून अयोध्याधामपर्यंत वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर २२ ते ३१ जानेवारीदरम्यान मंदीर दहा दिवस भाविकांना दर्शनासाठी खुले असेल. या दहा दिवसांदरम्यान दररोज सकाळ सायंकाळ महाआरतीसह सायंकाळी भजनसंध्या व विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. यात दि. २८ जानेवारी रोजी भजनसम्राट अनुप जलोटा यांचा भजनसंध्याचा कार्यक्रम देखील होणार आहे. परिसरात यात्रेतील पाळणे लावण्यात आले आहेत.

पोलीसांच्या त्रासामुळे चालकाने महामार्गावर आडवे केले वाहन

वाहतूक खोळंबली

सोनगीर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मुंबई आग्रा महामार्ग सोनगीरजवळील अपघातांसाठी कुप्रसिद्ध वाघाडी फाटा आहे. शिरपूरकडे जाणारी असंख्य वाहने थांबलेली होती. एक किलोमीटर पर्यंत रांग रंगा लागल्या होत्या. सर्व प्रसंग अनेकांना संभ्रमात टाकणारा होता.

महामार्ग सुरक्षा पथकातील पोलीस कर्मचारी व एक वाहन चालक यांच्यात झालेल्या वादातून चालकाने वाहन रस्त्यावर आडवे लावून रस्त्यावरील वाहतूक थांबवल्याचे लक्षात आले. वाहन चालक व कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद झाले, वाहन चालकाने आपण स्थानिक आहोत. मला सोडा, अशी गयावया केली. परंतु कर्मचाऱ्यांनी त्याला थांबवून ठेवले, अखेर त्याने वैतागून आपले वाहन रस्त्याच्या मध्यभागी उभे करून रस्ता अडवला. वाहनांची सोनगीर गावापर्यंत रांग लागली. यामुळे महामार्गावर अपघातांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या वाघाडी फाट्यावर अपघात झाला असेल या शंकेने अनेकांनी वाघाडी फाट्याकडे धाव घेतली. परंतु तेथे गेल्यावर प्रत्यक्षात वेगळाच प्रकार लक्षात आला. यावेळी अनेकांनी आपल्या खिशातील मोबाईल काढून घटनेचे चित्रीकरण सुरू केल्यामुळे अखेर नाईलाजाने महामार्ग सुरक्षा पथकातील कर्मचाऱ्यांना हे वाहन सोडून द्यावे लागले.

आसाममध्ये राहुल गांधींना धक्का-बुक्की

इटानगर । काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान आसाममध्ये रविवारी राहुल गांधींसोबत धक्काबुक्की झाली. राहुल गांधींना वाचवत त्याच्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना परत बसमध्ये नेले. घटनेच्या वेळी राहुल यांचा ताफा सोनितपूरमध्ये होता. या घटनेबाबत राहुल म्हणाले आज भाजपचे काही कार्यकर्ते आमच्या बससमोर झेंडा घेऊन आले. मी बसमधून उतरलो आणि ते पळून गेले. आमच्या विचारधारेचा लढा आहे, आम्ही कोणाला घाबरत नाही. ना नरेंद्र मोदींना, ना आसामच्या मुख्यमंत्र्यांना. न्याय यात्रेच्या ताफ्यावर ४८ तासांत दुसऱ्यांदा हल्ला झाल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच असा उत्सव देशात : विजय रत्नसुंदरसुरी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धर्मनगरी धुळे येथील धर्मसभेत पद्मभूषण जैनाचार्य विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी म. सा. 'राम आ रहे है' या विषयावर प्रवचन देताना म्हणाले, की स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच असा उत्सव देशात पाहायला मिळत आहे. प्रभू श्रीराम अयोध्येत बालकाच्या रूपाने वास करणार आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

मुलाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे मन निरागस असते. आज राम आरसा बनून आपल्यासमोर आले आहेत. या आरशात आपण स्वतः ला झाकून घ्यायचे आहे, राम केवळ वंदनीय आणि पूज्यनीय नाही तर अनुकरणीयही आहे. अयोध्येत राम मूर्तीची स्थापना होणार, मग आपल्या मनाला मंदिर बनवून त्यात रामाचे अस्तित्व प्रस्थापित करायचे आहे. रामाची हृदयात स्थापना करण्याचे पाच मार्ग, नाते जपण्यासाठी हक्काचा त्याग करा. सर्वोत्कृष्ट आणि परोपकारी यांच्या आदेशाचे पालन करा. स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवा. तुमच्या कुटुंबातील आणि तुमच्या स्वतः च्या जीवनातील प्रतिष्ठेचा आदर करा. मोह-आकर्षणात ओढू नका. असत्याचा वेग जास्त असला तरी विजयावर सत्यच पोहोचते. राम मंदिराच्या प्रतिष्ठेसाठी दोन प्रतिज्ञा घ्या. वेब सिरीज पाहू नका, भीतीमय चित्रपट पाहू नका, असा सल्लाही त्यांनी दिला. जैनांचार्य विजय रत्नसुंदरसुरीश्वर यांनी सांगितले, की रामराज्य हवे असेल तर प्रत्येकाने आपल्या कमवलेल्या धन-दौलत-मायापैकी किती हिस्सा रामासाठी आणि किती हिस्सा राज्यासाठी ठेवायचा हे आपण स्वत: ठरवायचे आहे. तरच रामराज्य होईल यात तीळमात्र शंका नाही. हिंदू कोण आहे? तर हिंसेमुळे ज्याचे हृदय दुखते ती प्रत्येक व्यक्ती हिंदू आहे.

संपुर्ण स्वच्छता अभियानात २२ टन कचरा संकलीत

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शासन आदेशानुसार राज्यातील सर्व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सखोल स्वच्छता मोहिम (डीप क्लीन ड्राईव्ह) राबविणेबाबत सुचित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिकेने दि.१६ ते २३ जानेवारी दरम्यान विविध मोहिम आयुक्त श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत प्रथम टप्प्यात रस्ते सफाई, मुख्य चौक, धार्मिक स्थळे, मंदिर स्वच्छता आदी उपक्रम प्रामुख्याने राबविण्यात आले पातळीवर कृती आराखडाप्रमाणे पांझरा नदीपात्रात स्वच्छता आहे. या मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू झालेला असून त्याची सुरूवात आज पाझंरा नदि स्वच्छता मोहिमेव्दारे करण्यात आली. यात गणपती मंदिर ते छोट्या पुलापावेतो असलेल्या नदि पात्राची स्वच्छता करण्यात आली. यात ६ झोन निश्चित करण्यात आले होते.

धुळे जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

सोनगीर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यातील पाच निरीक्षकांसह चार सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत, त्यात अलीकडेच जिल्ह्यात नव्याने हजर झालेल्या दोघा पोलीस निरीक्षकांना नव्या ठिकाणी नियुक्ती देण्यात आली आहे. आगामी निवडणुका पारदर्शी पद्धतीने पार पडाव्यात या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पोलीस दलातील अधिकाऱ्यांमध्ये फेरबदल केल्याची माहिती आहे. यामध्ये देवपूर पोलीस ठाणे, पश्चिम देवपूर पोलीस ठाणे, चाळीसगाव रोड पोलीस ठाणे, दोंडाईचा पोलीस ठाणे, शिरपूर पोलीस ठाणे, पिंपळनेर पोलीस ठाणे, त्याचबरोबर आझादनगर पोलीस ठाणे व शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे.

'वन नेशन, वन इलेक्शन', ईव्हीएम हे दोन्ही फ्रॉड

खा.संजय राऊत यांनी भाजपावर आरोप करत केला घणाघात

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

भारतीय जनता पक्षाने कायमस्वरुपी सत्तेवर राहण्यासाठी तसेच लोकशाही संपवण्यासाठी ईव्हीएम आणि वन नेशन, वन इलेक्शन हे दोन्ही फ्रॉड निर्माण केले आहेत. लोकशाही संपवण्यासाठी टाकलेले हे जाळे आहे. असा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी केला. भाजपाचा खरंच स्वत:वर विश्वास असेल तर त्यांनी ईव्हीएम हटवून निदान वाराणसी आणि सुरतमध्ये तरी निवडणूक घेवून दाखवावी, असे आव्हानही खा.राऊत यांनी भाजपाला दिले आहे.

भाजपाने तुष्टीकरणाचे राजकारण थांबवावे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी श्रीराम मंदिर सोहळ्यावरून तुष्टीकरणाच्या राजकारणावर बोट ठेवले आहे. यावर बोलताना खा. संजय राऊत म्हणाले की, आम्ही त्यांच्याशी सहमत आहोत. मंदिराचे काम पूर्ण झालेले नसले तरी रामलल्लांचे तेथे आगमन होत असल्याने आम्ही त्याचे स्वागत करतो. कोणाचाही याला विरोध नाही. फक्त भाजपाने तुष्टीकरणाचे राजकारण थांबवले तरच देशात शांतता नांदेल असा दावा त्यांनी केला.

नाशिक येथे काल रविवारी पत्रकार परिषदेत खा. संजय राऊत यांनी भाजपावर घणाघात करत आरोप केले आहेत. ते म्हणाले की, जनतेचा विश्वासच ईव्हीएमवर नाही. तर 'वन नेशन, वन इलेक्शन'ला तर सगळ्यांचाच विरोध आहे. स्वत:च्या क्षमतांवर भाजपाचा विश्वास असेल, तर त्यांनी एका निवडणुकीपुरती का होईना निदान वाराणसी आणि सुरतला ईव्हीएमशिवाय निवडणूक घेवून दाखवावी. ज्या दिवशी ईव्हीएम निघून जाईल, त्या दिवशी भाजपा ग्रामपंचायतीची निवडणूकसुद्धा जिंकणार नाही असा दावा त्यांनी केला. तसेच ईव्हीएमने लोकशाही तर अर्धी संपवलेली आहे, त्यात या नव्या फ्रॉडची भर पडली असून, तो देशातील लोकशाही पूर्णपणे संपवल्याशिवाय राहणार नाही असा इशारा त्यांनी दिला. जगभरात फक्त आपल्या भारतातच ही प्रक्रिया चालू आहे. सर्वात आधी भाजपच ईव्हीएमविरोधात सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला होता. तर ते आज तेच ईव्हीएमला कवटाळून बसले आहेत. तर याची कारणे समजून घ्या, असे आवाहन त्यांनी केले. भारतात हुकूमशाही असून महाराष्ट्रात दहाव्या शेडयूलचं उल्लंघन करून पक्षांतर झाले असून घटनाबाह्य सरकार सत्तेत आले असल्याचे आम्ही पुरावे आम्ही दिले. सगळे पुरावे असूनसुद्धा विधानसभा अध्यक्ष हे ते मिळालेच नाहीत असे सांगतात. यावरून आपल्या या देशात घटनात्मक संस्थांचे काम कसे चालते हे कळते. यावेळी खा. संजय राऊत यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या वक्तव्याचाही समाचार घेत त्यांच्यावर टिकास्त्र सोडले.

हाडाखेडजवळ ११ लाखांचा गुटखा भरलेला ट्रक पकडला

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर हाडाखेड (ता. शिरपूर) येथील सीमा तपासणी नाक्याजवळ ट्रकमधून पोलिसांनी ११ लाख रुपये किमतीचा गुटखा, पानमसाला आणि तंबाखू जप्त केला. ही कारवाई करताना पोलिसांनी चालकाला अटक केली.

सेंधव्याकडून शिरपूरकडे गुटख्याची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्याने सहाय्यक निरीक्षक सुरेश शिरसाट यांनी सहकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले. त्यावरून उपनिरीक्षक कृष्णा पाटील व सहकारी पेट्रोलिंग करीत होते. सकाळी हाडाखेड सीमा तपासणी नाक्याजवळ पोलिसांनी संशयित आयशर ट्रक (डीडी ०१, जी ९२४२)ला अडविले. साडेसात लाख रुपयांची स्वीट सुपारी, ७० हजार रुपये किमतीचा गुटखा, सव्वातीन लाखांचा पानमसाला, ५२ हजार रुपयांची तंबाखू असा मुद्देमाल आढळला. पोलिसांनी संशयिताला अटक केली. ट्रकसह मुद्देमालाची एकूण किंमत १९ लाख ७० हजार ३८६ रुपये आहे.

दावोस वारी; महाराष्ट्रासाठी ठरतेय भारी

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम ही सार्वजनिक, खासगी क्षेत्रातील सहयोगासाठी एक आंतरराष्ट्रीय बिगर - सरकारी संस्था असून ती जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे स्थित आहे व त्याची स्थापना २४ जानेवारी १९७१ रोजी जर्मन अभियंता क्लॉस श्वाब यांनी केली. जागतिक, प्रादेशिक आणि उद्योगविषयक अजेंडा तयार करण्यासाठी व्यवसाय, राजकीय, शैक्षणिक आणि समाजातील नेत्यांच्या मदतीने जगाची स्थिती सुधारणे, हे या फाऊंडेशनचे मुख्य ध्येय आहे. त्या पार्श्वभूमीवर दावोस येथे सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा तीन प्रकल्पांसाठी ७० हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर मॅग्नेटिक महाराष्ट्राच्या अद्ययावत अशा दालनात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महाराष्ट्राच्या 'ग्रीन हायड्रोजन'च्या धोरणाला या दौऱ्यात चांगलीच बळकटी मिळालेली दिसली. त्यातूनच दावोस येथे आयनॉक्स एअर प्रोडक्शनबरोबर २५ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. आयनॉक्स ही कंपनी अमेरिकेतील एक मोठी औद्योगिक वायू उत्पादन करणारी कंपनी असून महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करण्यात त्यांना रुची आहे. त्यासंदर्भात महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया प्रकल्प सुरू करण्यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांशी जैन यांनी चर्चा केली. तसेच देशातील एक मोठा उद्योग समूह असलेल्या बीसी जिंदाल यांच्याशीही ४१ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर देखील स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामुळे ५००० नोकऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात महाराष्ट्रात निर्माण होणार आहेत. महाराष्ट्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा हब निर्माण करण्यासाठी महाप्रीत आणि अमेरिकेच्या प्रिडीक्शन्स यांच्यात चार हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नावीन्यपूर्ण अशा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा प्रकल्प सुरू होईल. अशाप्रकारे भारतात सुरू होणारा हा पहिलाच प्रकल्प आहे. महाराष्ट्राच्या दालनात याबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्या. महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक अमोल शिंदे आणि क्रेड कंट्री नेटवर्कचे चेअरमन कार्ल मेहता यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. दावोस येथे आयोजित जागतिक आर्थिक परिषदेच्या निमित्ताने उभारण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या दालनात हे करार झाले. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची २०२३ ची वार्षिक बैठक दावोस येथेच १६ ते २० जानेवारी या दरम्यान 'विखंडित जगामध्ये सहकार्य' या थीम अंतर्गत झाली होती. त्यावेळी याच ठिकाणी विविध उद्योग, व्यवसाय आणि कंपन्यांबरोबर करार झाले होते. त्यांची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या गतीला चालना मिळाली आहे. महाराष्ट्राला गुंतवणुकीचे सर्वोच्च राज्य बनविणे आणि ते टिकवून ठेवणे याला राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रात एक गिगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर उभारण्यासाठी अदानी समूह पुढील १० वर्षांत ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या समूहाची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड आणि महाराष्ट्र सरकारने एक गिगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर उभारण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. दावोस येथे सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. हे डेटा सेंटर मुंबई किंवा नवी मुंबई आणि पुणे यांसारख्या मोठ्या शहरांच्या ठिकाणी स्थापन केले जाणार आहे. हे डेटा सेंटर अक्षय ऊर्जेद्वारे सक्षम केलेले असेल व जे महाराष्ट्रातील हरित ऊर्जेचा पाया घट्ट करेल आणि त्यातून २० हजार लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त होईल. अशा स्वरूपाच्या मेगा प्रकल्पांमुळे अवघ्या काही वर्षांत मुंबईला अक्षय ऊर्जा क्षेत्रात पुढे जाण्यास मदत झाली आहे. मुंबईचा अक्षय ऊर्जेचा वाटा आता मोठ्या जागतिक शहरांपेक्षा जास्त आहे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने २०२३ मध्ये, मुंबईच्या ग्राहकांना ३८ टक्के वीज नूतनीकरणीय स्त्रोतांकडून पुरवली होती आणि ती २०२७ पर्यंत ६० टक्क्यांपर्यंत नेण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यावर्षी उत्पादन, अन्न प्रक्रिया, डिजिटल-नैसर्गिक संसाधने यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये राज्यात मोठी गुंतवणूक यावी यासाठी सरकारकडून विशेष भर दिला जात आहे. महत्त्वाचे म्हणजे राज्यात होणाऱ्या गुंतवणुकीमुळे महाराष्ट्रात रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील आणि त्यातूनच शेतकरी, महिला, तरुण आणि सर्वच घटकांना निश्चितच फायदा होईल.

सर्वार्थाने आदर्श 'प्रभू श्रीराम'

२२ जानेवारीला श्रीरामजन्मभूमी अयोध्येत होणाऱ्या भव्यदिव्य श्रीराम मंदिराच्या उदघाटन सोहळ्याची उत्कंठा आता शिगेला पोहोचली आहे. अयोध्येत १६ जानेवारीपासून धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. श्रीरामललांच्या प्रतिष्ठापनेच्या मुहूर्ताला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रत्येक रामभक्त श्रीरामाच्या स्वागताची तयारी करत आहे. श्रीराम अयोध्येत विराजमान होणार असले तरी, तत्वरूपाने ते आपल्या प्रत्येकाच्या घरात येणार आहेत या भावाने प्रत्येक जण सिद्धता करत आहे. श्रीरामांचे अस्तित्व अनुभवता यावे यासाठी श्रीरामाचा प्रत्येक भक्त आपापल्या परीने काहीनाकाही प्रयत्न करताना दिसतो आहे. श्रीराम हे कोट्यवधी रामभक्तांचे आराध्य दैवत आहेत. आजही आदर्श राज्य म्हणून रामराज्याचे उदाहरण दिले जाते. राज्यकारभार कसा करावा, याचा परिपाठ श्रीरामाने आपल्या अवतारकार्यातून जगासमोर ठेवला आहे. २२ जानेवारीला श्रीराम अयोध्येत येणार आहेत, त्यामुळे भारतात रामराज्यही लवकरच अवतरेल, अशी समस्त रामभक्तांची धारणा आहे. श्रीराम हे सर्वार्थाने आदर्श होते त्यामुळेच ते आदर्श असे रामराज्य स्थापू शकले. भारतात रामराज्य स्थापायचे असेल, तर आधी ते स्वतःमध्ये स्थापन करावे लागेल. त्यासाठी स्वतः तील दोषांचे निवारण करून गुणांचे संवर्धन करावे लागेल. रामराज्य हे सर्वार्थाने आदर्श असण्याचे गुपित श्रीरामांमध्ये असलेल्याला गुणांमध्ये आहे. आज या लेखातून आपण श्रीरामांची काही गुणवैशिष्ट्ये जाणून घेणार आहोत. उपास्य देवतेसंदर्भात उपयुक्त माहिती मिळाल्यावर त्या देवतेप्रती श्रद्धा वाढण्यास साहाय्य होते. आपलीही श्रीरामांप्रतीची श्रद्धा वाढीस लागून श्रीरामाच्या अस्तित्वाचा आपल्या सर्वांना लाभ व्हावा ही श्रीरामप्रभुंच्या चरणी प्रार्थना !

१. आदर्श राजा : सीतामाता, श्रीलक्ष्मण यांसह श्रीराम वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर एका परिटाने सीतामातेविषयी संशय व्यक्त केला तेव्हा श्रीरामांनी प्रजेच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम नको म्हणून तात्काळ सीतामातेचा त्याग केला. ज्या अर्धांगिनीने श्रीरामांना वनवासात साथ दिली तिचा एका परिटाच्या संशयावरून त्याग करताना श्रीरामांनी एका राजासाठी प्रजा किती महत्वाची असते हे स्वतःच्या वर्तणुकीतून दाखवून दिले. श्रीरामाने राजधर्माचे पालन केले नाही असा चुकीचा संदेश येणाऱ्या पिढीकडे जाता कामा नये यासाठी श्रीरामाने आपल्या सहचारिणीचाही त्याग केला. जनतेच्या पैशांतून आपल्या सात पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा करणारे हल्लीचे राजकारणी कुठे आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी प्रसंगी धर्मपत्नीचाही त्याग करणारे प्रभू श्रीराम कुठे.

२. शत्रुवरही प्रेम करणारा : रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामाने रावणाचा बंधू विभीषणाला त्याचा अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. तेव्हा विभीषणाने त्यास नकार दिला. 'मरणांती वैराणी' या वचनानुसार मृत्यूनंतर वैरही संपते त्यामुळे तू जर रावणाचा अंत्यसंस्कार करायला तयार नसशील तर मी करतो, माझाही तो बंधूच होता असे प्रभू श्रीरामचंद्रानी विभीषणला निक्षून सांगितले. अखेर विभीषण श्रीरामांच्या सांगण्यावरून रावणाचा अंत्यसंस्कार करण्यास तयार झाला. रावण महादेवाचा थोर भक्त होता. भक्तीच्या बळावर त्याने प्रचंड बळ आणि सिद्धी हस्तगत केल्या होत्या ज्याचा त्याला गर्व झाला होता. श्रीरामांनी रावणाचा वध करून केवळ त्याची भूलोकीची यात्रा संपवली नाही, तर त्याचे गर्वहरण करून त्याचा कायमचा उद्धारही केला.

३. आदर्श पुत्र : श्रीराम सर्वार्थाने आदर्श पुत्र होते. प्रभू श्रीरामाच्या राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असतानाच सावत्र आई कैकयीने जेव्हा श्रीरामांच्या वनवासाच्या हट्ट धरला तेव्हा कोणतेही आढेवेढे न घेता श्रीरामांनी वनवासात जाण्यास तत्परतेने होकार दिला. वल्कले परिधान केली आणि वनवासात जाण्यासाठी सिद्ध झाले. वनवासाहून आल्यानंतर श्रीरामांनी कैकयी मातेचे आशीर्वाद घेतले. कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते कैकयी मातेशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने वागू लागले. कुठे सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या रक्ताच्या नातेवाईकांशी वैराने वागणारे हल्लीचे राज्यकर्ते आणि कुठे वडिलांनी सावत्र आईला दिलेल्या वचनाच्या पूर्ततेसाठी क्षणार्धात साऱ्या वैभवावर पाणी सोडणारे प्रभू श्रीराम !

४. आदर्श बंधू : आजही दोन भावांत प्रेमाचे नाते दिसले कि त्यांना आपण राम लक्ष्मणाची जोडी म्हणून संबोधतो. यावरून श्रीराम आणि लक्ष्मण यांमध्ये किती प्रेमाचे नाते होते हे लक्षात येते. वनवास श्रीरामांना देण्यात आला होता मात्र लक्ष्मणाने सारे वैभव सोडून श्रीरामांची साथ दिली. श्रीरामांनीही संपूर्ण वनवासकाळात लक्ष्मणाची सर्वार्थाने काळजी घेतली. बंधू वनवासात गेला असताना अयोध्येचे राज्य उपभोगायची संधी मिळाल्यावरही भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून विश्वस्त म्हणून राज्याचा कार्यभार सांभाळला. यावरूनच श्रीरामांनी भरताला काय ताकदीचे बंधुप्रेम दिले होते याची कल्पना येते. ज्या काळात रावणाने बंधू विभीषणाला सापत्न वागणूक दिली. वालीने बंधू सुग्रीवावर अन्याय केला होता त्याकाळात आदर्श बंधूप्रेमाचा परिपाठ श्रीरामांनी घालून दिला. वडिलांच्या संपत्तीमध्ये अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी एकमेकांचा जीव घेण्यास उठणाऱ्या आताच्या बंधूंनी श्रीराम लक्ष्मणाच्या नात्यातून बोध घ्यायला हवा.

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

५. संघटन कुशलता : रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर श्रीविष्णूचा अवतार असलेले श्रीराम रावणाला सहजपणे पराभूत करून सीतेला घेऊन येऊ शकले असते. एका हाताने शिवधनुष्य पेलणाऱ्या श्रीरामाचे सामर्थ्य काय होते याची कल्पना रावणालाही होती. अयोध्येहून सैन्य मागवून रावणावर चाल करूनही श्रीराम जाऊ शकले असते; मात्र त्यांनी तसे न करता वानरसेनेला संघटित करून त्यांची मने जिंकली आणि असुरी शक्तीविरोधात लढण्यासाठी मोठी फौज सिद्ध केली. वालीचा वध करून सुग्रीवाला जवळ केले. यावरून श्रीरामांमधील संघटनकौशल्य लक्षात येते.

६. एकपत्नीव्रत : ज्या काळात राजे आणि राजपुत्र अनेक विवाह करत त्या काळातही प्रभू श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. वनवासाहून आल्यानंतर एका परिटाच्या संशयावरून श्रीरामांनी सीतेचा त्याग केला. पुढे अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी पत्नीची आवश्यकता असताना प्रभू श्रीरामांनी दुसरा विवाह न करता सीतामातेची प्रतिकृती बनवून ती पत्नी म्हणून सोबत बसवली. पत्नीप्रती त्यांची निष्ठा या एका उदाहरणावरून लक्षात येते.

७. त्याग आणि साधेपणा : सावत्र माता कैकयीच्या वचनाचा आदर ठेवून त्यांनी एका क्षणात साऱ्या राजसुखाचा त्याग करून वल्कले परिधान केली. वनवासात काट्याकुट्यातून अनवाणी चालले. झोपडीत राहून कंदमुळे खाल्ली, जमिनीवर झोपले. जंगलातील वानरांना आणि अस्वलांना त्यांनी प्रेमाने जवळ केले, शबरीची उष्टी बोरे खाल्ली. यातून श्रीरामांतील त्यागाची आणि साधेपणाची जाणीव प्रकर्षाने होते. हल्लीचे राजकारणी निवडणूका आल्या की छायाचित्रे काढण्यापुरते गरिबांच्या झोपड्यांत जाऊन जेवतात(हे जेवणही फाईव्हस्टार हॉटेलमधून मागवलेले असते) कुठे अंगीभूत साधेपणा असलेले प्रभू श्रीराम आणि कुठे साधेपणाचा आव आणणारी आताची राजकीय मंडळी.

पुत्रवियोग सहन न झाल्याने राजा दशरथांनी प्राणत्याग केला. ही बातमी प्रभू रामचंद्रांना कळताच त्यांनी पितृवियोग न करता त्यांच्या पुढील गतीसाठी श्राद्धकर्म केले. यातून त्यांनी धार्मिक विधींचे महत्व अधोरेखित केले आहे. सीताहरण झाल्यानंतर सीतेच्या वियोगाने दुःखी झालेल्या श्रीरामांनी झाडांना कवटाळल्याचे संदर्भ आढळतात; मात्र भविष्याचेही ज्ञान असलेल्या श्रीरामांचा हा वियोग केवळ दाखवण्यापुरता होता. झाडांना मिठी मारून श्रीरामाने अनेक शापित जीवांना जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून कायमचे मुक्त केले. शबरीची भेट घेऊन आणि तिने दिलेली उष्टी बोरे खाऊन शबरीचाही उद्धार केला. अशी एक ना अनेक गुणवैशिष्ट्ये रामायणाच्या वाचनातून लक्षात येतात. अयोध्येत श्रीरामलल्लाचे आगमन झाले आहे. आपल्याही अंतःकरणात श्रीरामांनी वास्तव्य करावे, आपल्यातही श्रीरामांसारखे गुण यावेत यासाठी प्रभू श्रीरामांच्याच चरणी शरणागत होऊन प्रार्थना करूया !

शेवाळीच्या पांढरीत रुतलेला सृजनशील शिक्षक : एस बी नाना पाटील

शेवाळीच्या पांढरीत गावच्या मातीत चार दशके रममान होताना इथल्या प्रत्येक घटकांशी विचारधारांची नाते जोपासणारे, हजारो विद्यार्थ्यांच्या मनाचा ठाव घेणारे, सृजनशील शिक्षक नानासाहेब एस बी पाटील यांनी आज भल्या पहाटे आपला अखेरचा निरोप घेतला. शेवाळीच्या मातीत रुजलेले इथल्या कला संस्कृती परंपरा गद्य पद्य लोकसंगीत लोककला मूल्यशिक्षण इथल्या विविध व्यक्तिरेखा यांच्याशी एकरुप झालेले नाना आज आपल्यात नाहीत ही आरोळी हजारो विद्यार्थ्यांना मानसिक धक्का देणारी घटना आहे. हजारो विद्यार्थ्यांना अस्वस्थ करणारा हा सृजनशील शिक्षक एवढ्या घाईगर्दीने निघून जातील ही वास्तविकता अजूनही स्विकारण्यास मन तयार नाही. शिवाजी माध्यमिक विद्यालय शेवाळी या एकाच शाखेत चार दशके कार्यसिद्ध होताना नानांनी एक शिक्षकाची नोकरी म्हणून नव्हे तर एक व्रतस्थ स्वामित्व घेऊन अचाटप्रतिभा शक्ती ओतून विद्यार्थी हित पाहिले. नानांच्या कार्यकाळातील रात्रीचे मोफत अभ्यासवर्ग, प्रत्येक सांस्कृतीक कार्यक्रमातील नानांचे मार्गदर्शन विषेश करून निवेदन सूत्रसंचालन चिंतनाच्या पातळीवर असे.सरांचे अध्यापन मराठी इंग्रजी भूगोल या विषयातून असे.प्रत्येक विद्यार्थ्यांकडून दररोज एक निबंध एक कविता लिहून घेणं ही रोजनिशी होती त्यामुळे अभ्यासाकडे पूर्णवेळ दुर्लक्ष कारणारे विदयार्थी देखील दैनंदिनी निबंध कविता लिहून आणत होते. विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता कौटुंबिक पार्श्वभूमी त्याच्यातले उपजत गुण हे ओळखून नानांनी विद्यार्थी उभा करण्याचे काम केलं .ते करताना शाळेतील अध्यापनातील सर्व विषय कृतीयुक्त करुन सर्वांची मोट बांधून नानांमधली शेवाळीच्या मातीशी आणि शाळेची एकरूपता आम्ही अनुभवली .एक शैक्षणिक सामाजिक कौटुंबिक विषयाला हात घालताना अत्यंत सृजनशील शिक्षक म्हणून आपली जबाबदारी अखेरपर्यंत अत्यंत शिस्तप्रिय आणि बाणेदार शिक्षक म्हणून निभावली. शेकडो व्यक्तीरेखा घटना परिपाठ यावर अध्यापन करताना नानांनी भाव भावनांच्या हिंदोळ्यावर विद्यार्थ्यांना एकाग्र केलें भावस्पर्शी हृदयस्पर्शी वातावरणात चैतन्य निर्माण केले म्हणूनच शेवाळी गावातील सर्वांना नानांची दुःखद बातमी काळजावर घाव घालणारी आहे. त्यांचा तारुण्यातील काळ विद्यार्थी चळवळीसह धनेर गावाच्या विकास प्रक्रियेत सक्रिय होता.पुढें शिक्षकी पेशात आल्यानंतर शेवाळी गावात स्थिरावलेले शेवाळीकर झाले.ऊर्जावान शिक्षक म्हणून अध्यापन करताना समस्त विद्यार्थ्यांना गुरू शिक्षक पालक पितृतुल्य मातृतुल्य कवी लेखक नाटककार कथाकथनकांर अशी अनेक रूपं घेऊन नाना लाभले.नोकरी सेवकाळात सर हजरजबाबी संवादी विद्यार्थी प्रीय राहीले.अशातच सरांच्या कुटुंबावर नियतीने वज्राघात केला

सरांच्या पत्नी सौभागिनी पुष्पाताई अवघ्या पन्नाशीत गेल्या. सर हादरले पण पुन्हा उभे राहिले.पण अखेरच्या श्वासापर्यंत या माणसानं चारित्र्यशील राहून चात्रित्र्यवान ही कमाई राखून ठेवली.सरांच्या हयातीतील कमाई म्हणून पाहतांना त्यांच्याशी जोडलेली माणसं सहकारी शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्नेह भेटीतून सरांच्या वेदना पर्वातील काळ देखील अत्यंत सुखदाई गेला.त्यांचे मित्र जेष्ठ सहकारी दादासाहेब एम एन पाटील यांनी गेल्या आठवड्यातच पाटीलाभाऊ यांच्या तब्ब्येतीची काळजी वाहतांना अश्रू नयनांना वाट मोकळी करून दिली. माझे १९९३ इयत्ता १० वी वर्गाचे शाळकरी मित्र मैत्रिणी बंधु भगिनी

भावना भिला साळुंके, चंद्रकला रमेश साळुंके, मायादेवी आनंदा भामरे, विद्या उत्तमराव ठाकरे, संध्या अशोक साळुंके, मंदाकिनी गुलाबराव कापडणीस, किरण उत्तमराव देवरे, संगिता साहेबराव गांगुर्डे, मी स्वतः, गोरख भास्कर साळुंके, डॉ अविनाश दगा शेवाळे, सहाय्यक गटविकास अधिकारी असलेले प्रवीण भटू शिंदे, ड मोहन भिला साळूंके, संतोष विष्णू साळुंके, माध्यमिक शिक्षक छोटू अभिमन्यू सरक , भटू साहेबराव साळुंके यांनी देखील पाटील सरांच्या वेदना पर्वा नंतरच्या काळातील अनेक दिवस भेटी गाठी घेऊन सरांच्या भावनिक गप्पा आठवणी शेवाळी गावातील शाळेतील जुन्या जाणत्या पिढ्यातील अनेकविध आठवणींना वाटा मोकळ्या करून दिल्या.गप्पा मारताना गुरुजन म्हणून भेटी घेत आशीर्वाद घेतले. ऋण व्यक्त केले.सरांनी भविष्याकडील वाटचाळीस शुभकामना दिल्या.पिढ्या घडवताना राब राब राबतांना स्वर्गीय बी बी दादा साळुंके,

व्हि एस आप्पा जाधव , आर एम नाना नांद्रे, एस एन आबा कुवर, मुरलीधर आण्णा सोनार, एस के बापू पाटील, एस एम बापू शेवाळे, बी बी बापू देवरे आणि एस बी नानांनी आज आपल्याला सोडुन निरोप घेत वैकुंठाच्या प्रवासाला निघालेत.माजी विद्यार्थ्यांसाठी हृदय पिळवटून टाकणारी मन हेलवणारी घटना आहे.एकूणच शेवाळी गावातील समाजमन साक्री तालुक्यातील जनता जनार्दन दुखावले.

स्व एस बी नानांच्या जाण्याच्या बातमीनं सकाळी सकाळी मन बुद्धी शक्ती सर्व होत्याचं नव्हतं झालं. त्रांणहीण झालो.बराच वेळ काही सुचतही नव्हतं. शेवाळीच्या प्राथमिक माध्यमिक शालेय जीवनातील अनुभवांच्या शिदोऱ्या , खाल्लेला मार , विचारांची झालेली जडण घडणं,शिस्तीचे धडे, भविष्याकडे पाहताना घेता येतील अशा उत्तुंग भराऱ्यांची गाठोडी मिळालेल्या विचारांची देवाण घेवाण करणाऱ्या कर्मयोगी शिक्षकांची फौज होती.त्यातीलच नाना ही एक आर्त हाक देणारे सैनिक होते. या सर्व कर्मयोग्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी छोटासा सन्मान सोहळा आयोजीत करून अल्पसा सन्मान व्हावा यासाठी अनेक मित्राना शेकडो वेळा हाक दिली.पण स्वार्थाच्या पलिकडे जाण्याचा मोठेपणा कोणीही दाखवला नाही ही खंत कायम आहे .राहील. म्हणूंनच आज नानाना निरोप देताना दिलगिरी व्यक्त करून साश्रूनयनांनी अखेरची श्रद्धांजली वाहताना खूपच यातना होताहेत.शेवाळी गावाच्या प्रगती यज्ञाच्या पर्वातील एक अक्षता निवारली.असा कर्मयोगी होणे नाही.नाशिकच्या गंगा घाटावर पंचवटी अमर धाम येथे त्यांच्या पवित्र देहावर सायंकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.नानासाहेब माफ करा ही भावपूर्ण आदरांजली. समस्त माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शेवाळीच्या अनंत कर्मभूमीतून साश्रूनयनांनी भावपूर्ण अभिवादन.

किरण नांद्रे,
माजी विद्यार्थी, शेवाळी
९९२३७१०८४०.

शब्दकोडे-३००



आडवे शब्द -

२. वार्ताहर ६. शीण ९. गाय १०. मोफत ११. जोरात भांडण १३. नाराजी १५. उकळी, उमाळा १७. गुप्तचर, जासूस १८. अचेतन १९. गाणे २१. नांगर २२. जबाबदारी २३. अडथळा, पाचर २४. भंगुर २५. शांतता २७. रमलेला, एकरूप २८. पारंगत ३१. टिकाऊ ३२. रस्ता ३३. आपल्या देशाची राजधानी ३४. कावीळ ३७. हाणामारी ४०. असंमती ४२. त्रास, मेहनत ४४. प्रशंसा ४६. शरीरातून आरपार जाणारे किरण ४७. पायऱ्या असलेली विहिर ४८. धाक ५०. विस्तव ५२. डाळीचे कालवण ५३. महिला ५४. अभिमान ५६. विद्ध ५७. महादेव ५८. मर्यादा ५९. जावई ६१. रामजन्माक्षी तिथी ६३. प्रदेश, परिसर ६५. आश्रय ६७. लोभ ६८. संताप ७१. अनुमान, कल्पना ७२. पेच ७३. ढग ७५. ढीग ७७. लोकसंख्या मोजणे ७९. ठाऊक ८०. शैली ८१. थोडे ८२. प्रथा ८३. शरीर, उपजत कौशल्य ८४. किंचित ८५. पश्चिम दिशा, सूर्य मावळतो ते स्थान

उभे शब्द -

१. सहजी आकलन न होणारे २. लहानपण ३. लवण ४. कोरडे, रूक्ष ५. नागाची एक जात ७. दया यावी असे ८. गंध, परिमळ १०अ. ठोंब्या, निर्बुद्ध १२. गीते लिहिणारा १४. सरस्वती, शारदा १६. प्रिय स्त्री २०. होडी २२. अरण्य २६. रमलेला २७. पुराणातील घोडागाडी २८. गर्क २९. नोकरी नसलेला ३०. बस्तान ३१. आवाजी गोंधळ ३२. परीक्षा घेणारा ३५. लज्जास्पद ३६. एक मापी परिमाण ३८. राज्यसुख ३९. शेवटच्या प्रस्थानापूर्वी केलेली आवराआवर ४१. कारखान्याचा मालक चालक ४३. दया ४५. खात्री ४९. अचूक (प्रत्युत्तर) ५१. नौदल ५४. झेंडा ५५. मोलकरीण ५९. जगातील, जगाच्या संदर्भातील ६०. त्यानुसार ६१. पती ६२. कृष्णभक्त कवयित्री ६४. कृष्णाची दुष्ट मावशी ६६. श्रीराम ६९. गोंगाट ७०. समजायला सेपे ७४. गाव ७६. अखंड ७८. समाविष्ट ७९. पूर्वग्रह, प्रतिकूल ग्रह ८१. खाल्ल्यास पड

शब्दकोडे-२९९ चे उत्तर

● आडवे उत्तर

१.प्रगती ४.शिकरण ७.गगन १०.प्रणय ११.अनल १३.डास १५.वसन १७.पाव १८.गावसकर २०.नानकटाई २४.बडवा २७.कम जोर ३१.तराजू ३४.इडली ३६.दबाव ३७.पारख ३९.नतमस्तक ४०.सन ४१.काशी ४३.वाडगा ४५.डेरा ४८.रस ५०.तजवीज ५३.जास्त ५५.द्रव्यहीन ५८.टग्या ५९.रज ६०.मदत ६१.वखार ६२.खोपा ६३.जाहीर ६४.लता ६५.हतबल ६७.फक्त ६८.रमणी ६९.वरात ७१.बीट ७२.सखी ७३.वन्य ७५.लवकर ७८.रबर ८०.शेपू ८१.आसपास ८३.पर ८४.खळ ८५.श्री ८६.पावा ८७.कबड्डी ८८.सकस ९२.चॅपलीन ९३.रेखा ९४.लवाद

● उभे उत्तर

१.प्रणव २.गय ३.मानस ५.कडा ६.रसना ८.गवई ९.नस १०.प्रपाठक ११.अवधी १२.लकब १४.काक १६.नक्की १९.रडतखडत २१.नळी २२.टाच २३.आजोबा २५.वारा २६.गोड २८.मदन २९.रवका ३०.वपा ३२.जून ३३.अंमल ३४.इकडे ३५.लीला ३८.रवा ४०.सच्छिद्र ४२.शीर ४४.गाजरपारखी ४६.राजा ४७.बाही ४९.सटरफटर ५१.वीज ५२.पदरव ५४.स्तब्धता ५६.व्यथित ५७.नवल ६०.मही ६३.जाणीवपूर्वक ६४.लत ६५.हकालपट्टी ६६.बलाक ७०.राक्षस ७२.सर ७४.मास ७६.वर ७७.रखवाली ७९.बकबक ८१.आज्ञा ८२.पाठिंबा ८६.पाप ८८.सखा ८९.सल ९०.मंद ९१.जीत

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

शिवसेनेत असंख्य कार्यकर्त्यांचा प्रवेश

बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त विविध उपक्रम

२१ जानेवारीपासून शिवसेनेचा भगवा पंधरवडा

नाशिक । प्रतिनिधी

आज २२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात प्रभू श्रीरामच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व २३ जानेवारी रोजी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस व २७ जानेवारी धर्मवीर आनंद दिघे यांचा जन्मदिवस हा एक योगायोग येत आहे. तर श्री रामभक्तांसाठी व शिवसैनिकांसाठी ऐतिहासिक दिवस असून संपूर्ण भारताच नव्हे तर जगात हा दिवस साजरा केला जात आहे. नाशिक शहर व प्रभू श्रीराम यांचे वेगळे ऐतिहासिक नाते असून नाशिक महानगरात देखील तेवढ्याच मोठ्या उत्साहात हो सोहळा साजरा शिवसेनेच्या वतीने केला जाणार आहे. सर्व शिवसैनिकांनी यात आपला सहभाग द्यावा असे आवाहन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर-जिल्हा, मायको सर्कल येथे आयोजित शिवसेना बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना केले.

दरम्यान काल दि. २१ जानेवारी पासून शिवसेना नाशिक महानगरच्या वतीने शिवसेनेचा भगवा पंधरवडा साजरा करण्यात येत असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले. यात २२

जानेवारीला आयोध्येतील राम मंदिरात प्रभू श्रीरामच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व २३ जानेवारी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती व २७ जानेवारी धर्मवीर आनंद दिघे यांची जयंती हे कार्यक्रम असून त्या बरोबर शिवसेनच्या शाखा उद्घाटन, विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण सोहळे, संपर्क कार्यालयांची उद्घाटने, वैद्यकीय शिबीर, शासकीय योजनाचे शिबीर, महिला आघाडीच्या वातीने हळदी कुंकू समारंभाचे आयोजन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन येत्या १५ दिवसात शिवसेना महानगराच्या वतीने करण्यात येणार आहे.

याची सुरवात नाशिक शहरातील प्रमुख चौक भगवे करण्यात आले असून ठिकठिकाणी ३ फुटी मोठे आकाशकंदील लावून भगवे वातावरण तयार करण्यात आले आहे. याप्रसंगी शिवसेना महानगर प्रमुख प्रविण तिदमे, शिवसेना युवासेना नाशिक लोकसभा विस्तारक योगेश बेलदार, उप जिल्हाप्रमुख शामकुमार साबळे, शिवाजी भोर, दिगंबर मोगरे, शशिकांत कोठुळे, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, नाशिक लोकसभा संघटक योगेश म्हस्के, विस्तारक सोपान देवकर, विधानसभा प्रमुख विनायक (बाबुराव) आढाव, रोशन शिंदे, माजी नगरसेवक आर.डी. धोंगडे, अमोल जाधव, सचिन भोसले, नितीन साळवे, संघटक संजय काजळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख मंगला भास्कर, सुवर्णा मटाले, महानगर संघटक अस्मिता देशमाने, युवतीसेना उत्तर महाराष्ट्र निरीक्षक व जिल्हाप्रमुख हर्षदा गायकर, ॲड. योगिता ठाकरे, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, अंबादास जाधव, महानगर प्रमुख दिगंबर नाडे, उप महानगर प्रमुख सुधाकर जाधव, आनंद फरताळे, उमेश चव्हाण, कैलास जाधव, सुनील भंबारे, शुभम पाटील, सचिन मोगले आदी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरवातीला शिवसेना नाशिक जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्या ऊर्जा युवा प्रतिष्ठानच्या वतीने वतीने तयार करण्यात आलेल्या राम रक्षा स्तोत्र या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थित व शिवसेना नाशिक जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक पूर्व विधानसभा मतदार संघातील पंचवटी व जेलरोड नाशिकरोड विभागातील शिवसेना विभाग प्रमुख, उप विभाग प्रमुख, शाखा प्रमुख पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

मध्य नाशिक विधानसभा प्रमुख रोशन शिंदे यांच्या अध्यक्षेतेखाली अनिकेत इंगळे, अंकित गांगुर्डे, सोनू पाटील, शुभम इंगळे, गौरव गायकवाड, अभय गव्हांदे, आकाश ढोले, मोनू शेख, योगेश जगताप, आयुष भालेराव, विजय पाटील, आर्यन पाटील, शंकर दशरती, सुरज शेलार, उमेश शेलार, साई गोसावी, कृष्णा वर्मा, अविनाश पाटील, विजय मोरे आदींनी शिवसेनेत प्रवेश केला.

शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख मंगला भास्कर व सुवर्णा मटाले यांच्या अध्यक्षतेखाली ॲड. संगीता दवंगे, कोमल सोमवंशी, दिपाली साळुंखे, शीतल गगने, निलिमा शिरसाठ, वर्ष मोहिते, रुपाली दोदे, भाग्यश्री घरटे, लता श्रीराव, ज्योती लहानगे, प्रगती दवंगे, संस्कृती हुडे, भाग्यश्री घरटे, शोभा काठे, सिनकर काठे, अंकिता हजारे आदी महिलांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

सोहेल मोमीन यांची राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्षपदी निवड

लासलगाव । राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभाग ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी विंचूर येथील सोहेल मोमीन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन ही निवड करण्यात आली. मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात निवडी प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, अन्न नागरी व पुरवठा मंत्री छगन भुजबळ,विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल सोहेल मोमीन यांचे आमदार दिलीप बनकर यांनी अभिनंदन केले.

कत्तलखाने बंद ठेवण्यासह सार्वजनिक सुट्टीची श्रमिक सेनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नाशिक । प्रतिनिधी

श्रमिक सेनेच्या वतीने शिवसेना (उबाठा) उपनेते व संस्थापक अध्यक्ष धर्मवीर सुनिल बागुल यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाप्रमुख अजय बागुल, कार्याध्यक्ष बाळासाहेब पाठक, महानगरप्रमुख मामाजी राजवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना प्रभु श्रीरामचंद्र प्राणप्रतिष्ठा सोहळानिमित्त सोमवार दि.२२ रोजी नाशिक शहरातील कत्तलखाने व मांस

विक्री बंद ठेवावेत. तसेच या दिवशी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.

यावेळी श्रमिक हॉकर्स सेना कार्याध्यक्ष संदिप जाधव, उपजिल्हाध्यक्ष भुषण कासार, शहराध्यक्ष सागर दाते, राजाभाऊ चव्हाण, चिटणीस जयेश सूर्यवंशी, सुशिल काकडे, राकेश खैरनार, महेंद्र शर्मा यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रोसस जमा — ॲड्. श्रीमती. वनिता ए. खैरनार

जाहीर नोटीस

साक्री येथील तहसिलदार सो. यांचे कोर्टात

अर्ज क. ३४ / २०२३

अजय पंडीतराव नांद्रे, उ.व.४६, धंदा- नोकरी
रा. मालपुर, ता. साक्री, जि.धुळे .....अर्जदार
।। विरुध्द ।।
म. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मालपुर, ता.साक्री, जि.धुळे ..... जाबदेणार
कै. गोजरबाई सोनू नांद्रे, मृत्यू दिनांक - २१/१०/२००६
मृत्यु स्थळ- मौजे मालपुर, ता.साक्री, जि.धुळे

ज्या अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. तहसिलदार सो., साकी यांचे न्यायालयात दिनांक १५/१२/२०२३ रोजी अर्ज क्र. ३४/२०२३ दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म / मृत्यू अधि. १९६९ चे कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी नियम २००० मधील क्र. ९ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करणेबाबत साकी न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता दिनांक १३/०२/२०२४ ही तारीख निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील तहसिलदार सो. साक्री यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस तहसिलदार, साकी यांच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- १९/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — तहसिलदार, साक्री

ॲड. गणेश एम. पवार धुळे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ९७/२०२४

१. श्री. कृष्णा रामदास आखाडे उ.व.-६१ वर्ष, धंदा-मजुरी
२. श्री. कैलास रामदास आखाडे उ.व.-५४ वर्ष, धंदा-नोकरी
दोन्ही रा. वडजाई, ता. जि. धुळे. .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ... सामनेवाला
आणि
१. कै. पिरन तुकाराम शिंदे (मयत) मयत दि. १२/०२/१९८१,
२. कै. लक्ष्माबाई पिरन शिंदे (मयत) मयत दि. २५/०७/१९८६
३. कै. नाजुकबाई रामदास आखाडे (मयत) मयत दि. २६/०७/२००२
सर्वांचे मृत्यु ठिकाण : वडजाई, ता. जि. धुळे. ..... (मयत)

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. तुकाराम शिंदे (मयत) यांचे अर्जदार नं. १ व २ हेच कायदेशीर वारस असुन तसा वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय तसेच महसुल दप्तरी तसेच खाजगी कामाकरीता तसेच शैक्षणिक कामासाठी आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. ११/०१/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२०/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ३ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तकारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ११/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — अधिक्षक
दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे — दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे

जनस्थान आयोजित आठवणीतील चहा उपक्रमात मान्यवर जुन्या आठवणीत रममाण

नाशिक । प्रतिनिधी

सकाळची बोचरी थंडी, कॉलेज जीवनातील आठवणी, जुन्या मित्रांच्या भेटी, सोबतीला वाफाळलेला चहा आणि आठवणीमध्ये मित्रमंडळी पुन्हा एकदा कॉलेज रोडवरील सलीम टी स्टॉल येथे रममान झाले. निमित्त होते जनस्थान या कलावंतांच्या ग्रुपतर्फे खास आठवणीतील चहा या अभिनव उपक्रमाचे. नाशिक मधील प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, राजकीय नेतेमंडळी, कलाक्षेत्रातील मान्यवर कलाकार, कॉलेजमधील तरुण मंडळी, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती सलीम टी स्टॉल या ठिकाणी येऊन आठवणीतील चहा या उपक्रमास चहा पीत मित्रांसमवेत गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

जनस्थान या कलावंतांच्या आणि ११.३० सलीम या ग्रुप तर्फे खास आठवणीतील चहा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे हे सहावे वर्ष होते. यावर्षीच्या आठवणीतील चहा उपक्रमात नाशिक मधील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच चहा सोबतच्या आठवणी सर्वांसमवेत शेअर केल्या.

माणसांच्या शेवटपर्यंत येते ती म्हणजे आठवण. आठवणीच्या पलीकडे माणसांकडे काहीच राहत नाही. असाच एक उपक्रम म्हणजे आठवणीतील चहा सलीम मामा टी स्टॉल हे नाशिक मधील फार महत्त्वाचं नाव आहे. ज्या नावाशिवाय कॉलेजपासून सुरू झालेले आयुष्य ते संपत असेपर्यंत सलीमच्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. अशा या नावासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी आठवणीतील चहा सोबत गप्पांसह गायन व वादनाचा कार्यक्रमही ठेवण्यात आला होता. नाशिक मधील कलाकारांनी गायन व वादनासह या कार्यक्रमात रंगत आणली व सर्व उपस्थितांचे मनोरंजन केले. सहभागी कलावंतांचा सुप्रसिद्ध अभिनेता कांचन पगारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रोसस जमा — ॲड्. श्रीमती. वनिता ए. खैरनार

जाहीर नोटीस

साक्री येथील मा.सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी कि. अर्ज क. २७४ /२०२४

श्रीमती रंजना सुकलाल मोरे, उ.व.४६, धंदा-घरकाम,
रा. म्हसदी प्र.पिंपळनेर, ता. साक्री, जि.धुळे .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ..... जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात दिनांक २८/०७/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, कै. लाशीबाई गुलचंद भिल यांचे दिनांक १९/०७/१९९६ रोजी निधन झाले आहे. मयतांचे मृत्यूसमयी त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत-

१. रंजना सुकलाल मोरे - मुलगी

मयतास वरील प्रमाणे वारस असुन त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. मयत कै. लाशीबाई गुलचंद भिल यांचे कायदेशीर वारस असलेबाबत घोषित होवुन मिळणेकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी मा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, साक्री यांचे न्यायालयात दिनांक ०२/०३/२०२४ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- १९/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, साक्री — दिवाणी न्यायालय, साक्री

ॲड. जे. डी चौधरी धुळे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज क्र. ८५/२०२४

१. राधिका शिवाजी देवरे उ.व.-२७, धंदा-घरकाम
रा. सावको पो. लोहोनेर, ता. जि. नाशिक.
२. मोनाली उमेश जाधव उ.व.-२४, धंदा-घरकाम,
रा. देवघट, ता. मालेगाव, जि. नाशिक. .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .....सामनेवाला
आणि
नरेश काशिनाथ कदम (मयत) मृत्यु दि. १७/०१/२०२३
मृत्यु ठिकाण धुळे, ता. जि. धुळे ..... (मयत)

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात नरेश काशिनाथ कदम (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार हे नरेश काशिनाथ कदम (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. १६/१/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०७/०३/२०२४ निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो व स्तर कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २०/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकून — अधिक्षक
मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. — मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

ॲड. दिनेश व्ही. माळी
नि.१४

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्त.) यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १३४७/२०२४

श्री. दिपक अशोक महाजन वैगरे २ .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .....जाबदेणार
कै.निलेश अशोक महाजन (मृत्यू दिनांक २४/०७/२०२१) ..... (मयत)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९५६ चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला (डींलरशींळेप उर्शींळषळलरींश) मिळणेसाठी म.दिवाणी न्यायालय, क.स्तर, धुळे न्यायालयात अर्ज केलेला आहे. दाखल अर्जात पुढीलप्रमाणे मयत निलेश अशोक महाजन यांचे दिनांक २४/०७/२०२१ रोजी निधन झाले आहे. त्यांचे कायदेशीर वारस पुढीलप्रमाणे आहेत.

अ.नं.	नाव	मयताशी नाते
१	श्री.दिपक अशोक महाजन	- भाऊ
२.	सौ.सिमा किशोर माळी	- बहीण

ज्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मयत निलेश अशोक महाजन हे आर्मी मध्ये नोकरीस होते. ते देशसेवा करत असतांना शहीद झालेले आहेत. त्यांना सरकारकडून नुकसानभरपाई मिळणार आहे. मयत निलेश अशोक महाजन यांच्या निधनानंतर सदर केंद्र सरकारकडून रक्कम रुपये २५,००,०००/- नुकसानभरपाई मिळणार आहे. त्यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांचे व्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी धुळे येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्त.) धुळे यांच्या न्यायालयात दिनांक: २१/०२/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काही एक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. सदर जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :धुळे
दिनांक: १९/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकून — अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय (व.स्त.), धुळे — सह दिवाणी न्यायालय (व.स्त.), धुळे

दसक-पंचक, जेलरोड परिसरात श्री रामचंद्र आनंदोत्सव सोहळा

नाशिकरोड । प्रतिनिधी

संपूर्ण भारत देशभरात दि.२२ जानेवारीला सोमवारी दिवाळी सणासारखे वातावरण राहणार असून श्री रामचंद्रांचा जयघोष देशभरात घुमणार आहे. तीर्थक्षेत्र नाशिक नगरीत देखील यानिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दसक-पंचक जेलरोड परिसरात दि.२१ ते २६ जानेवारी दरम्यान प्रभू श्रीराम उत्सव समिती, शिवराज्याभिषेक समिती दसक व टीम ध्येयपूर्ती नाशिक, शिवजन्मोत्सव सोहळा समिती, दसक-पंचक जेलरोड परिसरातील सर्व मित्र मंडळांच्या वतीने मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र आनंदोत्सव सोहळाआयोजित केला आहे. यानिमित्त सलग सहा दिवस विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीरामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या भव्य मंदिरात होणार आहे. याच निमित्ताने दसक-पंचक, जेलरोड परिसरात प्रभू श्रीराम उत्सव समिती व शिवराज्याभिषेक समिती दसक तसेच टीम ध्येयपूर्ती नाशिक आणि दसक पंचक जेलरोड परिसरातील जय जनार्दन भक्त मंडळ, श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ शिवजन्मोत्सव सोहळा समिती दसक-पंचक जेलरोड, वंदे मातरम सोशल युवा मंच व अनेक मित्र मंडळांच्या सहकार्याने 'मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र आनंदोत्सव' साजरा होणार आहे. दसक-पंचक, जेलरोड परिसरात अयोध्येतील श्री राम मंदिराचा भव्य असा देखावा साकारण्यात आला आहे. कै. सागर आप्पा आढाव चौक, इंदिरा गांधी पुतळा जवळ नारायण बापूनगर, दसक जेलरोड येथे समारंभ होणार आहे. यासाठी देखावा उभारणीचे काम मुंबई येथील शिवडी मधील कुशल कारागीर रात्रंदिवस मेहनत घेऊन आकर्षकपणे हा देखावा साकारत असून सर्व काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.

प्रोसस जमा — ॲड. चंद्रकला देवरे

जाहीर नोटीस

साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी कि. अर्ज क. २५/२०२४

श्रीमती विजया भ्र. रामदास चौधरी, वय-६०, धंदा- घरकाम,
रा. वाल्हवे, ता.साक्री, जि.धुळे वैगरे .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ..... जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात दिनांक १७/०१/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, कै. तुळशिराम देवा गायकवाड(कोकणी) यांचे दिनांक ०८/०५/२०२० रोजी निधन झाले आहे. मयतांचे मृत्यूसमयी त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत-

१. विजय भ्र. रामदास चौधरी -मुलगी
२. मनोहर तुळशिराम गायकवाड -मुलगा
३. चंदनबाई भ्र. पारु पवार -मुलगी
४. नरेंद्र तुळशिराम गायकवाड -मुलगा
५. कांतिलाल तुळशिराम गायकवाड-मुलगा
६. प्रमिला तुळशिराम गायकवाड -मुलगी

मयतास वरील प्रमाणे वारस असुन त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. मयत कै. तुळशिराम देवा गायकवाड (कोकणी) यांचे कायदेशीर वारस असलेबाबत घोषित होवुन मिळणेकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, साक्री यांचे न्यायालयात दिनांक २८/०२/२०२४ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- १९/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, साक्री — दिवाणी न्यायालय, साक्री

प्रोसेस पेड — ॲड.गायत्री पी. वाणी
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ६९/२०२४

१. विलास भिका चौधरी, उ. व.: ६२ वर्षे, व्यवसाय: शेती
२. रोहीदास विलास चौधरी, उ.व. : ४१ वर्षे, व्यवसाय: हातमजुरी
अर्जदार नं. १ व २ दोघे रा. १६२७, भांग्या मारुती जवळ, गल्ली नं. ६, धुळे, ता. जि. धुळे
ह. मु. प्लॉट नं. ७, अलंकार सोसायटी, मार्केट यार्ड, धुळे, ता. जि. धुळे
३. दिपाली विलास चौधरी (लग्नाआधीचे नाव)
दिपाली किरण चौधरी (लगनानंतरचे नाव), उ.व.:३८ वर्षे, व्यवसाय: गृहीणी, रा. जुना असोदा रोड, गोपाल पुरा, जळगाव, ता. जि. जळगाव.....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ..... सामनेवाला
(छायाबाई विलास चौधरी) ..... (मयत)

कायदेशीर वारस (डशसरश्र क्शळीहळ उर्शींळषळलरींश) प्रमाणपत्र मिळणेकामी

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी मयत छायाबाई विलास चौधरी यांचे कायदेशीर ठरवून मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. न्यायालयात वारस अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी मे. न्यायालयात आपली लेखी हरकत धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर. कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात दि.२६/२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. न्यायालयात स्वत: किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहून सदर कामी आपले म्हणणे, तकारी लेखी स्वरूपात हरकत सादर करवी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होऊन वरील अर्जदार यांना मयत छायाबाई विलास चौधरी यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (डशसरश्र क्शळीहळ उर्शींळषळलरींश) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत ऐकून घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १६/०१/२०२ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दिनांक : १६/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे — दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे

ॲड. ज्योत्स्ना पाटील, धुळे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२३/२०२४

कलाबाई पंडीत चव्हाण
उर्फ कमलाबाई पंडीत चव्हाण .....अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ..... सामनेवाला
कै. पंडीत हिरामण पारधी दि. ०७/०४/२००९ ..... (मयत)

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. पंडीत हिरामण पारधी यांचे कायदेशीर वारस आहे. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं २ यांचे कोर्टात दि. २९/०२/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकिलामार्फत/प्रतिनिधीमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे- न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना कै. पंडीत हिरामण पारधी यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (डशसरश्र क्शळीहळ उर्शींळषळलरींश) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कुणाचीही काहीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सही/शिक्यानिशी आज दि.१९/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १९/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन
कामगिरी कारकुन — अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे — दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे

न्यूज कॉलम

क्रेडिट कार्डधारकांची ३३ लाखांची फसवणूक

नाशिक । आरबीएल बजाज क्रेडिट कार्ड बंद करण्याच्या नावाखाली त्या कार्डचा वापर करून ४१ तक्रारदारांना ३३ लाख ३५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. संशयित कमलेश मनसुब खटकाळे (पसार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. क्रेडिट कार्ड बंद न करता १ लाख १४ हजार रुपये स्वत:साठी वापरत रितेश यांची फसवणूक केली.

परिमंडळ दोनमध्ये कोम्बिंग ऑपरेशन

नाशिक । पोलिस आयुक्तालय हद्दीतील परिमंडळ दोनमध्ये पुन्हा टवाळखोरांनी डोके वर काढल्याने, आगामी महत्त्वाच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या परिसरात पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबविले. यादरम्यान पोलिस ठाणेनिहाय सराईत गुन्हेगारांची धरपकड करण्यात येऊन १७२ टवाळखोरांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

ऑलिम्पिक धावपटू कविता राऊत यांचा पूर्णाकृती पुतळा क्रीडापटूंसाठी प्रेरणादायी: ना.भुसे

पुतळ्याचे मविप्र मॅरेथॉन चौकात अनावरण

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मविप्र संस्थेने पुढाकार घेऊन कविता राऊत यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला. नाशिक जिल्ह्यातील क्रीडापटूंसाठी प्रेरणा देणारा हा क्षण असून कविताने महाराष्ट्र व नाशिकचे नाव मोठे केले असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम, उपक्रम व पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले. ते गंगापूर रोडवरील मविप्र मॅरेथॉन येथे धावपटू कविता राऊत यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी आयएमआरटी महाविद्यालयात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे होते.

व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्रवासराव मोरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक ड.आर.के. बच्छाव, ड.संदीप गुळवे, ड.लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, प्रविण जाधव, विजय पगार, अर्जुन टिळे, उदय सांगळे, स्वाती भामरे, रविंद्र नाईक, नाना महाले आदी उपस्थित होते.

ना. दादाजी भुसे बोलतांना म्हणाले की, कष्ट आणि जिद्दीचे उत्तम उदाहरण म्हणजे कविता राऊत आहे. मविप्र संस्थेने पुढाकार घेऊन एक स्वतंत्र क्रीडा प्रबोधिनी सुरु करावी. जिल्ह्यातील वेगवेगळ्या खेळात प्राविण्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यामुळे एक व्यासपीठ उपलब्ध होईल. त्यासाठी शासनपातळीवरून मान्यता व निधीसाठी पुढाकार घेऊ. जिल्हा नियोजन व डीपीडीसी मधून निधीची तरतूद करू असे आश्रवासन दिले.

अध्यक्षीय मनोगतात सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांनी कविता राऊत ही नाशिक जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आयडॉल आहे. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवावे. शासकीय पातळीवर खेळाडूंसाठी भरपूर नोकऱ्या असून विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून बघावे. मविप्र मॅरेथॉन राज्य व राष्ट्रीयस्तरावर यशस्वी झाली असून येत्या २-३ वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न केला जाईल. संस्थेच्या माध्यमातून रेडीओ केंद्र उभारण्यात येईल. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संगीत महोत्सव,जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाईल असे ठाकरे यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुतळ्याचे शिल्पकार अविनाश आडके, तुषार कटारे, विजय काळे यांना गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ.भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, डॉ.डी.डी. लोखंडे, डॉ. अजित मोरे, प्रा. बी.डी. पाटील, प्रा. दौलत जाधव उपस्थित होते.

भाजपा किसान मोर्चाचे महामंत्री,बिंदूशेठ शर्मा धुळे लोकसभासाठी इच्छुक, पत्रपरिषदेत मांडली भूमिका

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

भाजपा किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस, महामंत्री, शेतकरीपुत्र बिंदुशेठ शर्मा यांनी शेतकरीवर्गाच्या विविध प्रश्नांवर भूमिका स्पष्ट करून धुळे लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी करण्यास इच्छुक असल्याचं २१ जानेवारी रोजी पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

आतापर्यंत अडीच लाख शेतकऱ्यांनी धुळे जिल्ह्यातून पीकविम्यासाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी १ लाख २९ हजार शेतकऱ्यांना पिकविम्याचा लाभ मिळाला आहे. पिकविम्याचे पैसे लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर जमा झाले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांच्या रजांमध्ये तरुणी दर्शवून त्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. यात बँकांनी शेतकऱ्यांच्या पिकविम्याच्या रकमा लाटल्याचा आरोप शर्मा यांनी केला. बँका ज्या शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज आहे त्या शेतकऱ्यांच्या पिकविम्याचा पैसा परस्पर वर्ग करून घेत आहेत. या फसवणुकीमुळे शेतकरी पिकविम्याच्या लाभापासून वंचित राहिला आहे. वास्तविक पिकविम्याचे पैसे हे कर्ज नसून अनुदान स्वरूपात आहे. शेतकऱ्यांचे अनुदानाचे पैसे अडवून न ठेवता ते त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावे असे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र बँका शासनाचे आदेश पायंदळी तुडवत शेतकऱ्यांना लुटत आहेत असा आरोप बिंदुशेठ शर्मा यांनी केला आहे. धुळे लोकसभा मतदारसंघातून भाजपतर्फे उमेदवारास इच्छुक असल्याचेही शर्मा म्हणाले. आपण भाजपात गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठेने काम करीत असल्याने तिकीट मिळेलच असा दावा देखील शर्मा यांनी केला.

जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर कामे तातडीने सुरू करावी : जिल्हाधिकारी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत करण्यात येणा-या विविध मंजूर विकास कामांना गती द्यावी. ज्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे त्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यारंभ आदेश द्यावे तसेच वितरीत झालेला निधी विहित मुदतीत खर्च करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल दिल्या.

जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकीस मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील, हिरे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सभाजी भामरे, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर, मनपा उपायुक्त संगिता नांदुरकर, शिल्पा नाईक, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मृतदेहाच्या अंगावरील सोने चोरले; सिव्हिलमधील प्रकार

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिल्हा रुग्णालयात नोकरीला असल्याचे भासवून संशयिताने मयत महिलेच्या अंगावरील १५ हजार रुपयांचे मंगळसूत्र व अन्य दागिने परस्पर काढून घेतले. सदरची बाब नातलगांच्या लक्षात आल्यानंतर चौकीतील पोलिसांना सांगितले. पोलिसांनी तात्काल सीसीटीव्ही फुटेज तपासून परिसरात असलेल्या संशयितांच्या मुसक्या आवळल्यात आणि त्यास सरकारवाडा पोलिसांच्या हवाली केले. सुरज सुनील भवर (२६, रा. विजय नगर, हिरावाडी रोड, पंचवटी) असे संशयिताचे नाव आहे.सीसीटीव्ही तपासले असता, त्यामध्ये निदर्शनास आलेल्या संशयिताचा पोलिसांनी रुग्णालयाच्या आवारात शोध सुरू केला. त्यावेळी तो रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळच होता. त्यास पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीराममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त प्रभा परदेशी यांनी आदिवासी वस्तीत केलं दिव्यांचं वाटप

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणाऱ्या श्रीराममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त घरोघरी दीप लावून दीपोत्सव साजरा करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. हाच संदेश घेऊन प्रत्येक विधानसभा व लोकसभा मतदारसंघ क्षेत्रातील खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी यांच्या वतीने घरोघरी दिव्यांचं वाटप केलं जात आहे.

या धर्मकार्यात राजकीय, सामाजिक महिला कार्यकर्त्या प्रभा परदेशी यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत दिवे वाटपाचा कार्यक्रम राबविला आहे. आदिवासी वस्तीत जाऊन दिवे वाटप करीत श्रीराममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला दीपोत्सव साजरा करण्याचं आवाहन केलं.

भाजप दिव्यांग आघाडीतर्फे मंदिर स्वच्छता अभियान

नाशिक । भारतीय जनता पार्टी सिडको मंडल एकच्या वतीने मंदिर स्वच्छता अभियान व अक्षदा वाटपाचा कार्यक्रम स्वामी विवेकानंदनगर पावन गणपती मंदिर येथे अभियान राबविण्यात आले. तसेच अंबड पोलीस स्टेशन येथे सर्व पोलीस बांधवांना राम लल्लाच्या कार्यक्रमाच्या अक्षदा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजन दिव्यांग आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे, जान्हवी बिरारी यांनी केले होते. यावेळी न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई घुगे, मंडल उपाध्यक्ष उत्तम काळे, मंडल एकचे सरचिटणीस राजेंद्र जडे, सुनील हजारे, दिव्यांग आघाडीचे मंडळ अध्यक्ष सुरज वाजे, मंडल पदाधिकारी ज्योती वाईकर, आरती खैरनार, शारदा शर्मा, पुजा शेवाळे, सविता राजपुत, सिमा शिंदे, रंजना गोईल, विद्या जोशी यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब घुगे व जान्हवी बिरारी यांनी केले होते.

नदीपात्रात विविध प्रकारचे पाळणे उभारल्याने अयोध्याधाम परिसरात श्रीराममंदिर दर्शनासह नागरिक घेतील यात्रेचा आनंद

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

माझे शहर, माझी अयोध्या या घोषवाक्याखाली श्रीरामभक्त अनुप अग्रवाल यांनी धुळे शहरातील पांझरा नदीपात्रात कालिकादेवी मंदिरालगत अयोध्या येथील श्रीरामंदिराची भव्य हुभेहूब प्रतिकृती साकारली आहे. अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणाऱ्या श्रीराममंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ही प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

अयोध्येत जाता आले नाही पण धुळ्यात अयोध्येप्रमाणेच उभारलेल्या श्रीराममंदिराचं दर्शन सर्व रामभक्त व जनतेला घडावं या धर्मभावनेतून अनुप अग्रवाल यांनी ही प्रतिकृती उभारली आहे. यानिमित्ताने या परिसरास तात्पुरते अयोध्याधाम असे नाव देण्यात आले असून या ठिकाणी २१ ते ३१ जानेवारीदरम्यान दररोज महाआरती, पूजाविधी, होमहवनसह विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. तसेच अयोध्याधाम परिसरात विविध प्रकारचे लहान-मोठे पाळणे उभारले गेले आहेत. यामुळे अयोध्याधाम परिसराला यात्रेचा लुक लाभला आहे. दर्शनासाठी मुलाबाळांसह येणाऱ्या कुटुंबियांना विशेषतः बच्चे कंपनीला या पाळण्यांचा आनंद लुटता येणार आहे. श्रीराममंदिर दर्शनासह पाळण्यांचा आनंद लुटण्यासाठी १० दिवस हे पाळणे खुले असतील. या पाळण्यांमध्ये लहान मुलांसाठी छोटे-छोटे विविध प्रकारचे पाळणे, जम्पिंग, रेल्वे, झुला उपलब्ध आहेत. तर मोठ्यांसाठी मोठे पाळणे, झिकझॅक, मोठे जहाज, टोराटोरा असे विविध प्रकारचे पाळणे लावण्यात आले आहेत अशी माहिती पाळणे व्यावसायिक शरद वेंदे यांनी दिली.

मालदिव्जचं एमएफएन स्टेटस समाप्त करा

शिवसेनेची पीएमओकडे मागणी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मालदीव्ज हे आपले शेजारील राष्ट्र गेल्या काही महिन्यांपासून भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार, राजनैतिक हितसंबंध व सुरक्षेस बाधा पोहचेल अशा प्रकारचे निर्णय एका पाठोपाठ एक घेत असल्यामुळे आता ह्या देशाला आपल्या एमएफएन यादीतून काढून त्यांचे अवास्तव लाड बंद करावेत. अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते व आयटी सेल जिल्हाप्रमुख नितीन देशमुख यांनी पंतप्रधान कार्यालयास (पीएमओ) इमेलद्वारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती देतांना अजय बोरस्ते यांनी सांगितले कि, मालदिव्जमध्ये गेल्या सप्टेंबरपासून भारतद्वेषी सरकार सत्तेत आले असून, भारतासोबतचे जवळपास शंभर करार नवीन राजवट आल्यानंतर त्यांनी रद्द केलेत. आता मालदीव्जचे एमएफएन स्टेटस् काढून भारतविरोधी भुमिका घेणा-या देशांसमोर एक उदाहरण प्रस्तुत करण्याची गरज आहे.

गुलाबी थंडीत पहाटेपासू चिमठाणे गावात कासार मॅरेथॉन २०२४ उत्साहात संपन्न

चिमठाणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथे अ.भा. सो. क्ष.कासार समाज मध्यवर्ती मंडळ अध्यक्ष शरदराव भांडेकर आणि वरिष्ठ समाज बंधू भगिनी यांच्या मार्गदर्शनाखाली कासार समाज मॅरेथॉन२०२४ आयोजित करण्यात आली होती.

मॅरेथॉन मध्ये सहभाग होताना सुभाष अण्णा कोळपकर, विलास भाऊसाहेब कोळपकर, विष्णू अण्णा आदमनके, राजू शेटे, चंद्रकांत कोळपकर, सुनील आदमनके, दत्तूभाऊ कोळपकर, कैलास भाऊ कोळपकर, रजनीकांत कोळपकर, किरण कोळपकर, दीपक तांबट, सचिन कोळपकर, प्रशांत कोळपकर, अनिल तांबट, संदीप वासुदेव कोळपकर, दिनेश कोळपकर, श्री महेश शामराव कोळपकर तसेच बहुसंख्येने उपस्थित असलेल्या महिला भगिनींनी उद्घोषणा देतं कार्यक्रम लक्षवेधी ठरली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री कालिकामातेची पूजा प्रार्थना व आरती विधिवत करून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली.

गावातील ग्रामदेवता श्रीराम मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्री सिद्धिविनायक मंदिर, श्री क्षेत्र संतोषी माता मंदिर, श्री स्वामी समर्थ केंद्र यांचे दर्शन घेऊन कार्यक्रमाची सांगता करताना सर्व समाज बंधू भगिनी एकत्र बसून एकमेकांच्या तब्येती, आरोग्य विषयक तसेच इतरही खुशालीचा सुसंवाद, आस्थेने विचारपूस करत चहापाणी चा आस्वाद घेताना गप्पा रंगताना एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आज दि २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे संपन्न होत असलेल्या श्री राम जन्मभूमीच्या प्रतिष्ठा कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री कालिका मंदिरात एकत्र येण्याचे ठरवले व दिवाळी सारखा सण साजरा करत लाइटिंग दिवा जेवणात गोड पदार्थ असं नियोजन केले. जय श्रीराम जय कालिका घोषणा देत कार्यक्रमाचे समारोप करण्यात आला. कार्यक्रमात महेश कोळकर यांनी मॅरेथॉनचे महत्त्व आरोग्य विषयक चालण्याचे फायदे तसेच विलास भाऊसाहेब कोळपकर यांनी दिनांक २२ जानेवारी च्या निमित्ताने करावयाची धार्मिक विधिवत कार्यक्रमाविषयी जनजागृती केली. श्री रजनीकांत कोळपकर आरके इलेक्ट्रिकल्स यांच्या वतीने चहा पाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. २२ जानेवारी २०२४

धुळ्यात श्री रामलल्ला मूर्तीची भव्य दिव्य शोभायात्रेने वेधले लक्ष

धुळे ।
मराठा संपूर्ण भारतभुमी सध्या प्रभू श्रीरामचंद्राच्या भक्तीमय वातावरणात तल्लीन झाली आहे. सर्वत्र अयोध्येतील रामलल्लांच्या भव्य- दिव्य मंदिराची चर्चा सुरु आहे. देशातील प्रत्येक श्रीरामभक्ताला अयोध्येतील हे भव्य श्रीराम मंदिर पहाण्याची आतुरता लागली आहे. नेमकी हिच बाब हेरुन धुळ्यातील सनातन धर्मासाठी अग्रसेर असणारे प्रभू श्री रामभक्त अनुप अग्रवाल यांनी हेरली व आयोध्येतील राम मंदिराची भव्य प्रतीकृती धुळे महानगरीत साकारली आहे. पांझरा नदीपात्रात पंचमुखी हनुमान मंदिरालगत साकारण्यात आलेली ही मंदिराची प्रतिकृती धुळेकरांसाठी खास आकर्षण ठरत आहे. आजपासून दहा दिवस या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून सर्व श्रीराम भक्तांना धुळ्यातच अयोध्येतीलमंदिराचे दर्शन घेतल्याची अनुभूती येणार आहे. श्रीराम मंदिराची प्राणप्रतिष्ठा होत असल्याने देशात दिवाळीचे वातावरण आहे. धुळ्यातही आनंदोत्सवाला आतापासूनच उधाण आले आहे. रामभक्त अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून शहरातील पांझरा नदी याठिकाणी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती साकारल्याने धुळ्याला अयोध्येचे स्वरूप प्राप्त झालेआहे. या मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आज पार पडणार आहे. तत्पूर्वी दि २१ रोजी सायंकाळी ४ वाजता शहरातून श्री रामलल्ला मूर्तीची भव्य दिव्य शोभायात्रा निघणार आहे. यामध्ये हजारोंच्या संख्येने रामभक्त सहभागी होणार असून धुळ्यात आज सायंकाळी 'एक ही नारा.. एक ही नाम.. जय श्रीराम...जय श्रीराम... हा जयघोष ऐकायल मिळाला. उत्कृष्ट प्रतिकृती साकारल्याबद्दल व भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल अनुप अग्रवाल यांचे कौतुक केले जात आहे. या शोभायात्रेत विविध पथके, नृत्यपथक, ढोलपथक, देखावे यांचा समावेश होता. या शोभायात्रेला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून सुरवात होईल. येथून महात्मा गांधी स्मारक, श्री स्वामी समर्थ मंदिर मार्गे पांझरा नदीकिनारी आयोध्या नगरी येथे आल्यानंतर समारोप करण्यात आला.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

एक ही नारा एक ही नाम...जय श्रीराम...जय श्रीराम!

धुळ्यात शहरातून श्री रामलल्ला मूर्तीची भव्य दिव्य शोभायात्रा

धुळे । श्रीराम मंदिराची प्राणप्रतिष्ठा होत असल्याने देशात दिवाळीचे वातावरण आहे. धुळ्यातही आनंदोत्सवाला आतापासूनच उधाण आले आहे. रामभक्त अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून शहरातील पांझरा नदी याठिकाणी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती साकारल्याने धुळ्याला अयोध्येचे स्वरूप प्राप्त झालेआहे. या मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आज पार पडणार आहे. तत्पूर्वी दि २१ रोजी सायंकाळी ४ वाजता शहरातून श्री रामलल्ला मूर्तीची भव्य दिव्य शोभायात्रा निघणार आहे. यामध्ये हजारोंच्या संख्येने रामभक्त सहभागी होणार असून धुळ्यात आज सायंकाळी 'एक ही नारा.. एक ही नाम.. जय श्रीराम...जय श्रीराम... हा जयघोष ऐकायल मिळाला.

संकलन : दिपक वाघ